**सीएनआर : एमएचआरजी०७–०००००३–२०१८**

(सरकार वि. तुळशीराम विष्णु वाघमारे उर्फ हिलम )

## न्यायनिर्णय

( घोषित दिनांक ०३/०१/२०२० )

१. सरकारी वकिल व आरोपीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले, त्याचे निष्कर्ष मी त्यासमोर त्याखालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे :—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक ०७/०९/२०१६ रोजी, १८.०५ वाजणेच्या सुमारास, मौजे बीड बुद्रुक गावचे हद्दीत, तुम्ही विनापरवाना, बेकायदेशीररित्या प्लॅस्टिक कॅनमध्ये १५ लिटर गावठी हातभट्टीची दारु चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताबेकब्जात बाळगल्याचे स्थितीत आढळून आला, ही बाब सरकारीपक्षाने शाबित केली आहे काय? | नाही |

## कारणमिमांसा

२. सरकारी पक्षातर्फे एकूण २ साक्षीदार तपासण्यात आले.

३. **मुद्दा क्र.१ साठी** :—

फिर्यादी पोलीस शिपाई रमेश भागोजी दोरताले (सा.क्र.१) यांच्या साक्षीप्रमाणे, दिनांक ०७/०९/२०१६ रोजी ते पोलीस ठाण्यात हजर असताना पोलीस अधिक्षक कार्यालयात स्थानिक लोकांनी बीड बुद्रुक गावात आरोपी दारु विक्रीचा व्यवसाय करतो असा अर्ज केला होता. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशाने त्यांनी इतर पोलीस कर्मचारी यांचेसह मौजे बीड बुद्रुक येथे पंचांसह आरोपीच्या घराच्या पाठीमागे छापा टाकला असता त्यांना आरोपी कॅन घेवून बसलेला दिसला. त्यांना आरोपीच्या ताब्यात १५ लिटर गावठी हातभट्टीची दारु आढळून आली. पोलीस हवालदार तांडेल यांनी जप्त मुद्देमालाचा नमुना घेतला व पंचनामा तयार केला. फिर्यादीने फिर्याद (नि.१२) नोंदविली.

४. पोलीस नाईक सतिष सदानंद पाटील (सा.क्र.२) यांच्या साक्षीप्रमाणे, त्यांनी सदर गुन्हयाचा पुढील तपास केला. ठाणे अंमलदार यांनी फिर्याद नोंदवून घेतल्यानंतर पंचनामा त्यांचे ताब्यात दिला होता. मुद्देमाल ताब्यात मिळाल्यानंतर त्यांनी मुद्देमाल पावती (नि.१६) तयार केली. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जप्त नमुना रासायनिक तपासणीसाठी पत्राने (नि.१७) पाठविला व तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले.

५. सरकारी पक्षातर्फे याकामी पंच साक्षीदार व पंचनामा करणा—या पोलीस अधिका—यांची साक्ष नोंदविली नसल्याने पंचनामा शाबित झालेला नाही. याकामी वाहकाची साक्ष नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रासायनिक तपासणीसाठी पाठविण्यात आला हे सिध्द झाले नाही. तसेच सरकारीपक्षातर्फे रासायनिक पुथ्थ:करणाचा अहवाल दाखल केलेला नसल्यामुळे जप्त मुद्देमाल गावठी दारु होती हे सिध्द झाले नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारित करते :—

## <u>आदेश</u>

१. आरोपीची मुंबई प्रतिबंधक कायदा कलम ६५(ई) अन्वये अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६४ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्रे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे आरोपीने जामीन दयावा.

४. अपिल कालावधीनंतर जप्त मुदद्ेमाल एक प्लॅस्टिक कॅन नियमानुसार नाश करण्यात यावा व जप्त मुद्देमाल गावठी हातभट्टीची १५ लिटर दारु, अपिल कालावधीनंतर निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क, कर्जत यांच्याकडे कायदयाप्रमाणे विल्हेवाट

लावणेकरिता पाठविण्यात यावा.

Digitally signed by Shraddha Jitendra Dolare
Date: 2020.01.06 17:40:04 +05'30'

कर्जत ( श्र.जि. डोलारे )
दिनांक: ०३/०१/२०२० न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कर्जत

| | | |
|---|---|---|
| १. | न्यायनिर्णय सौ.श्र.जि.डोलारे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत यांनी लघुलेखन दिल्याचा दिनांक | : न्यायनिर्णय थेट संगणकावर टंकलिखित केल्याने त्याबाबतचा शेरा निरंक. |
| २. | न्यायनिर्णय टंकलिखित केल्याचा दिनांक | : ०३/०१/२०२० |
| ३. | न्यायनिर्णयावर न्यायाधीशांनी सही केल्याचा दिनांक | : ०३/०१/२०२० |
| ४. | न्यायनिर्णय नक्कल विभागाकडे नकलेसाठी पाठविलेचा दिनांक | : |

Digitally signed by Shraddha Jitendra Dolare
Date: 2020.01.06 17:40:31 +05'30'

कर्जत (श्र.जि. डोलारे)
दिनांक :– ०३/०१/२०२० न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत
जि. रायगड.